CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३५४

**निंबाचिया झाडा साखरेचें आळें ।**
**बीज तैसीं फळें येती तया ।।**

सदुपयोगासाठी प्राप्त झालेली बुध्दी माणूस जेव्हा दुरुपयोगासाठी वापरतो, तेव्हा अशा माणसांना माणूस म्हणायलाही माणसास लाज वाटते. माणूस या शब्दाला लाजवणारे भरपूर लोक समाजात आहेत. असे लोक इतरांच्या नजरेतून उतरलेले असतात. पण स्वत:च्या नजरेत मात्र उच्चस्थानावर असतात. इतरांच्या नजरेतून उतरण्यापेक्षा स्वत:च्या नजरेतून उतरणे अत्यंत लाजीरवाणे असते. हे सत्य असले तरी स्वत:च्या नजरेतून उतरलेला माणूस जर सकारात्मक दृष्टीकोनातून स्वत:कडे पाहू लागला तर तो तात्काळ सुधारतो. पण कांही लोक स्वत:ची नजरच स्वभावाशी एकरूप करून टाकत असतील तर त्या नजरेतून उतरण्याचा प्रश्न उद्भवलेच कसा ? अशा अत्यंत वाईट, खडूस स्वभावाच्या लोकांना कोणाचाही सहवास लाभला तरी त्यांच्या वर्तनात बदल होत नाही. बाह्यांगी अत्यंत चांगल्यांचा सहवास लाभला तरी अंतरंगी खऊटपणा जोपासणाऱ्यांचे वर्तन चांगले होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.



निंबाच्या झाडाला साखरेचे आळे करून पाणी घातले तरी त्याला फळे ही मूळ गुणानुसार कडूच येतात. त्याप्रमाणे अंतरंगच कडवट असेल तर बाह्य सहवासाचा उपयोग होत नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**निंबाचिया झाडा साखरेचें आळें ।**
**बीज तैसीं फळे येती तया ।।**

अंतरंगात वाईटपणा ठसठसून भरला असेल व असा स्वभाव सोडण्याची मूळीच इच्छा नसेल तर अशांना संत सज्जनांचा सहवासही सहजासहजी कांही करू शकत नाही. म्हणूनच की काय, कूवर्तनी असणा-या एखाद्याला सहारा नाही म्हणून आपल्या घरात सहारा दिला असता तो आपलेच कांही तरी चोरून वाटोळे करून, आई बहिणीकडे वाईट नजरेने बघून निघून जातो. खातो तेथेच घाण करून जातो. संत सज्जनांच्या सहवासात राहून त्यांचीच टिंगल टवाळी, चहाडी, चोरी, निंदा करतो. सदगुणाला अंतरंगात थोडासाही वाव न देणारे असे लोक देहू, आळंदी, पंढरपूरच्या दिंडीत हजारो संत, सज्जनाच्या सहवासातही सुधारत नाहीत. अर्थात, संत ज्ञानोबा-तुकारामांचा गजर यांच्या हृदयात उतरत नाही. म्हणूनच की काय अनेक वारकऱ्यांची खिसे कापली जातात, चपला, बुट, सामान चोरीस जाते. जे लोक संत, सज्जनांच्या सहवासात किंवा दिंडीत जाऊनही सुधारत नाहीत ते इतरत्र कोठेही, कोणाच्याही सहवासाने सुधारणे अत्यंत कठीण आहे. असो कोणी सुधरो किंवा न सुधरो आपण आपले मार्गदर्शनाचे,सुधारण्याचे कार्य करीत राहावे. आपल्या अशा चांगल्या कार्याची नोंद कोठे ना कोठे तरी होत राहतेच. कोठेच नोंद होत नसेल तर किमान आपल्या हृदयात तरी होते. आपल्या कार्याचा साक्षीदार इतरांनी होण्यापेक्षा आपण स्वत: होणे अत्यंत महत्वाचे असते. आपला साक्षीदारपणा आपणास चुका करु देत नाही. तसेच झालेल्या चुकांची आठवण करुन देत असतो. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरुवार,**
**दि. १२ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ दशमी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- ज्येष्ठा (१३.४१)**
**योग - हर्षण (२७.०४)**
**करण - बव (२५.२६)**
**राहू काल :**
**गुरूवार : दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष :**
२००३: भारताने आवाजापेक्षा दुप्पट वेगवान अशा ब्राह्मोस क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.
१९७६: पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते केरळमधील इडुक्की प्रकल्प देशाला अर्पण करण्यात आला.
१९९३: एम. एन. व्यंकटचलैया यांनी भारताचे २५ वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.

# यंदाही शिवजयंतीमध्ये 'डॉल्बी'ला फाटा

## ८० टक्के कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न मिटणार, पोलिस आयुक्तांकडून निर्णयाचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीमध्ये सुरुवातीलाच डॉल्बीमुक्त मिरवणुका काढण्यात येणार असल्याची घोषणा झाल्याने ८० टक्के कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न संपतोय. मध्यवर्तीच्या या निर्णयाचे स्वागत व अभिनंदन आम्ही करतो. शिवजयंती काळामध्ये सर्व समस्या सोडवण्याचा प्रयत्न आम्ही करू, असे आश्वासन आयुक्त पोलीस आयुक्त एम. राजकुमार आणि महापालिका आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे यांनी दिले.




महाराष्ट्रामध्ये सोलापूर शहर हे रोल मॉडेल आहे असे बनवून नागरिकांनी दाखवले आहे, यामध्ये पोलीस प्रशासनाचा कोणताही रोल नाही आम्ही फक्त सर्वांना मार्ग दाखवण्याचे काम करतो. यामध्ये फक्त डीजे डॉल्बीचाच निर्णय नसून सर्व जाती धर्मातील लोकांनी सामाजिक सलोखा कशा पद्धतीने राखला पाहिजे हे सोलापूरकरांनी दाखवून दिले आहे. या दोन वर्षांच्या कार्यकाळात पोलीस आयुक्त म्हणून मी कार्यकाळ केला याचा मला अभिमान असल्याचे मत पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी शांतता कमिटी बैठकीवेळी मांडले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पोलीस आयुक्तालय येथे दि. १० फेब्रुवारी रोजी सर्व मंडळांच्या उपस्थितीत व पोलीस अधिकारी महापालिका अधिकारी एमईसीबी व इतर प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शांतता कमिटीची बैठक पार पडली.

या बैठकीवेळी उपायुक्त पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस उपायुक्त गौहर हसन, पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका अकुलवार आदी पोलीस, महापालिका व प्रशासनामधील अधिकारी कर्मचारी व छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आलेले शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मौलाना आझाद पॉलिटेक्निक येथे तांत्रिक महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

येथील तांत्रिक क्षेत्रातीस मौलाना आझाद पॉलिटेक्निक होटगी येथील कॉलेजमध्ये संपन्न झालेल्या तांत्रिक महोत्सवाचे उद्घाटन विश्वविद्या विकास मंडळाचे अध्यक्ष फैज इनामदार यांच्या हस्ते झाले. सोलापूर जिल्हा दक्षिण तालुका येथील होटगी गावात असलेल्या मौलाना आझाद पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमात अध्यक्ष अमिरुद्दीन शेख, सचिव नुराशा सय्यद आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना सरफराज शेख यांनी केले. प्राध्यापक अमरीन यांनी आभार मानले. अतिया यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आसमा तांबोळी, शिवराज हरवले, निखिल दुधगी, बसवराज भूषण, हर्षद शेख, जुनेद शेख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे योगदान लाभले.

## ग्रामीणच्या ९० पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**



ग्रामीण घटकातील रिक्त ९० पोलीस शिपाई पदाची भरती प्रक्रिया सुरू असून त्यामध्ये ११ फेब्रुवारी रोजी पासून पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथे अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक यांच्या नेतृत्वात शाररिक चाचणी झाली. सदर भरतीसाठी सोलापूर ग्रामीण घटाकाकडे एकूण ४११३ उमेदवारांच अर्ज प्राप्त असून ५०० उमेदवारांची शाररिक चाचणी प्रक्रिया पार पडली. त्यानंतर पुढे टप्या-टप्याने शाररिक चाचणी पार पडणार आहे. या चाचणीसाठी आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात आलेली असून त्यामध्ये प्रथम उमदेवारांची नोंदणी, कागदपत्र तपासणी, बायोमेट्रीक तपासणी झाल्यानंतर त्यांची शारीरक चाचणी घेण्यात येणार आहे. सर्व भरती प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शी असून सर्व भरती प्रक्रिया ही सीसीटीव्ही च्या निगरणी खाली पार पडणार आहे. तसेच व्हीडीओग्राफी देखील करण्यात आलेली आहे. या भरतीमध्ये आरएफआयडी चा देखील वापर करण्यात येणार आहे. यामुळे १०० मीटर, ८०० मीटर यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. प्रत्येक ठिकाणी नियम व अटी यांचे डिजीटल बोर्ड लावण्यात आलेले आहे. याची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक यांनी कोणत्याही उमेदवारांनी कोणाच्या भूल थापा, आश्वासन यांना बळी पडू नये अशा प्रकारे कोणी उमेदवारांना फसविण्याचा प्रकार करत असल्यास त्यांनी पोलीस विभागाशी संपर्क करावे. बाहेरगावहून येणारे उमेदवारांच्या मुक्कामाची सोय देखील पोलीस मुख्यालयजवळ करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी देखील सदर भरती प्रकियेस पारदर्शीपणे सामोरे जावे, त्यामध्ये कोणत्याही गैरकायदेशीर मार्गाचा वापर करू नये आवाहन केले आहे.



## 'ऑर्किड'मध्ये रस्ता सुरक्षा अभियानबाबत जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

तळे हिप्परगा येथील नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयात शिवसमर्थ मोटार ड्रायविंग स्कूलतर्फे रस्ता सुरक्षा अभियान राबवण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, असिस्टंट आरटीओ इन्स्पेक्टर स्वप्नील गिरी, आय.एम.व्ही. आरटीओ इन्स्पेक्टर प्रतीक्षा नारायणकर, पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम व रस्ता सुरक्षा अभियानाबाबत माहिती दिली. या अभियानात अपघात होण्याचे कारण, अपघात होऊ नये यासाठी पाळण्याचे वाहतूक नियम, हेल्मेटचे महत्व तथा अन्य सर्व बाबी प्रतीक्षा नारायणकर यांनी विद्यार्थ्यांना जनजागृती केली. औद्योगिक संस्थेतील मुलांतर्फे पथनाट्य सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्रादेशिक परिवहन कार्यालय, शिवसमर्थ ड्रायविंग स्कूलचे संचालक संतोष नामदास, सन्मित्र मोटार ड्रायविंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रफुल्ल पानगावकर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. सूत्रसंचालन विद्यार्थी प्रणव गायकवाड याने केले. कार्यक्रम एन.एस.एस.चे प्रमुख प्रा. रेवणसिद्ध बकरे, डॉ. मुमताज शेख यांनी आयोजन केले होते.

## शिवजयंतीनिमित्त 'मंगळवेढा किल्ला' ऐतिहासिक सहल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

पर्यावरण आणि वारसा संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या इको फ्रेंडली क्लबकडून यंदाची शिवजयंती अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात येणार आहे. ज्या भूमीवर खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांचे वास्तव्य लाभले, त्या ऐतिहासिक मंगळवेढा भुईकोट किल्ला दर्शनासाठी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी एक दिवसीय विशेष सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. इतिहासाच्या पाऊलखुणा शोधणाऱ्या शिवभक्तांसाठी ही सहल पर्वणी ठरणार आहे. १६६५ च्या विजापूर मोहिमेत महाराजांनी मंगळवेढा किल्ल्यात सात दिवस मुक्काम केला होता. या ऐतिहासिक घटनेची साक्ष देणाऱ्या या किल्ल्याची माहिती नवीन पिढीपर्यंत पोहोचवणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या 'वन डे टूर'मध्ये पर्यटकांना मंगळवेढा किल्ल्यासोबतच संत दामाजी मंदिर, श्री रिद्धी सिद्धी महागणपती मंदिर, काशीविश्वेश्वर मंदिर, श्री सिद्धेश्वर मंदिर माचणूर या पर्यटन स्थळांनाही भेट देता येणार आहे. अधिक माहितीसाठी ८८८८८५६५३० किंवा ९०२१२२१११४ या क्रमांकावर संपर्क साधावा.



# पुणे-सोलापूर महामार्गावर एसटी चालकावर हल्ला

## चार ते पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ फेब्रुवारी-**

पुणेसोलापूर महामार्गावरील रावणगाव (ता. दौंड) परिसरात सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास धक्कादायक घटना घडली. एसटी बसला कार आडवी लावून कारमधील चार ते पाच जणांनी एसटी चालकाला जबरदस्तीने खाली ओढत बेदम मारहाण केली. या घटनेत सोलापूर आगारातील एसटी चालक अतुल भोसले गंभीर जखमी झाले असून, त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे.

घटनेनंतर जखमी अवस्थेत असलेल्या चालकाला एसटीतील प्रवाशांनी तत्काळ मदत केली. रुग्णवाहिका बोलावून त्यांना दौंड येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मारहाणीमुळे भोसले काही काळ बेशुद्ध अवस्थेत होते. मंगळवारी शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

या संपूर्ण प्रकाराला एका प्रवाशाने काढलेल्या व्हिडिओमुळे वाचा फुटली. संबंधित प्रवाशाने हा व्हिडिओ चालकाच्या मोबाईलवर पाठवला होता. शुद्धीवर आल्यानंतर चालकाने हा व्हिडिओ राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकारी व सहकाऱ्यांना पाठवला. घटनेची माहिती मिळताच सोलापूर आगार प्रमुखांनी दौंड येथे धाव घेऊन रावणगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

त्यानुसार कार क्रमांक एमएच ४२ बी.एन ७७९८ मधील चार ते पाच अज्ञात व्यक्तींविरोधात रावणगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू असून आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी पथके नेमली आहेत. दरम्यान, या घटनेचा निषेध करत एसटी कर्मचारी संघटनांनी संताप व्यक्त केला आहे. दोषींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत असून, अन्यथा आंदोलनाचा इशारा संघटनांकडून देण्यात आला आहे. सार्वजनिक वाहतूक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# शिवसंदेश शिवजन्मोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी आदित्य राजपूत यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

नवी पेठेतील शिवसंदेश शिवजन्मोत्सव तरुण मंडळाची बैठक राष्ट्रीय छावाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा शिवसंदेश ग्रुपचे संस्थापक ॲड. योगेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत सर्वानुमते नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.



यावर्षी शिवजन्मोत्सवाचे २२ वे वर्ष आहे. यावर्षी शिवजन्मोत्सव काळात गोल्डन टेंम्पल (आयप्पा स्वामी) देखावा साकारण्यात येणार आहे. बैठकीचे सूत्रसंचालन सचिन गुळग यांनी केले. यावेळी ॲड. सचिन गायकवाड, रवि गोयल, मनोहर गोयल, विश्वजित चूंगे, राहुल गोयल, विनोद पवार, अजिनाथ परांडकर, प्रमोद लोखंडे, विशाल पवार, संभाजी जाधव, नवाज शेख, क्रांती गोयल, अप्पू गुजले, इम्रान शेख, हरी कोळेकर, देवीसिंग राजपूत, धनंजय जाधव, बाळू लोंढे, दत्ता जाधव, रसूल पठाण, आनंद नरळे, सागर काटकर, तानाजी नरळे, ओंकार लोखंडे, आदित्य राजपूत, आकाश देवकुळे, संजय फुलारी, संतोष गुंड, राजू माने, सादिक पिरजादे, उमेश पवार, संदेश लोखंडे, अभिषेक राजपूत उपस्थित होते.

**नूतन पदाधिकारी असे -**

कार्याध्यक्षः विजय माने, उपाध्यक्षः गणेश घोडके, सचिव : किरण गुळग, खजिनदार : ओंकार लोखंडे, प्रसिद्धीप्रमुख : शैलेन्द्र पाटील, पुजा प्रमुख : आरीफ शेख, सचिन गोयल

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात गणित, संख्याशास्त्र विषयांचे महत्व : डॉ. कमलजा

**सोलापूर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुलाकडून राष्ट्रीय परिषद**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात गणित आणि संख्याशास्त्र या विषयांचे महत्व वाढले असून गणित, संख्याशास्त्र आणि संगणकशास्त्र या विषयामंध्ये संशोधनाच्या नवीन संधी निर्माण झाल्या असल्याचे प्रतिपादन जळगाव विद्यापीठाच्या गणितीय संकुलाच्या संचालिका प्रा. डॉ. किर्ती कमलजा यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुलाकडून आयोजित मॅथेमॅटिकल अँड स्टॅटिस्टिकल कॉम्पुटिंग या दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उदघाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाला व्यासपीठावर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.(डॉ.) प्रकाश महानवर, कुलसचिव डॉ. अतुल लकडे, संकुल संचालक डॉ. राजीवकुमार मेन्ते तसेच संयोजक डॉ. ज्योती माशाळे व डॉ. चंद्रकांत गार्डी हे उपस्थित होते. संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजीवकुमार मेन्ते यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.(डॉ.) प्रकाश महानवर यांनी अशा परिषदांमुळे संशोधकांना नवीन ऊर्जा मिळत असल्याचे सांगून परिषदेच्या सहभागींना मार्गदर्शन केले. संयोजक डॉ. ज्योती माशाळे यांनी आभारप्रदर्शन केले. तसेच संकुलातील प्रा. ख़ुशी खडलोया व प्रा.महिमा जगले यांनी सूत्रसंचालन केले. परिषदेच्या आयोजनासाठी विद्यापीठाचे प्रकुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा व पीएम उषा विभागाचे समन्वयक डॉ.प्रभाकर कोळेकर यांचे सहकार्य लाभले. या परिषदेचे आयोजन प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत विद्यापीठास प्राप्त निधीमधून करण्यात आले आहे.


देशभरातून १६५ संशोधकांनी परिषदेसाठी सहभाग नोंदवला असून ९२ संशोधन निबंध सादर केले जाणार आहेत. परिषदेसाठी साधन व्यक्ती म्हणून प्रा. बी.व्ही. धान्द्रा , प्रा. सुभाष केंद्रे, प्रा. कीर्ती कमलजा, प्रा. रुपाली जैन, प्रा. के. डी. कुचे , प्रा. सुभाष उन्हाळे, डॉ. अनिकेत मुळे आणि डॉ. संतोष सुतार(क हे उपस्थित राहणार आहेत.

# महाशिवरात्री : आध्यात्मिक जागृतीचे महापर्व

महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील एक धार्मिक उत्सव नसून आध्यात्मिक जागृतीचा आणि निसर्ग-पुरुषाच्या मीलनाचा सोहळा आहे. 'महाशिवरात्री' हा उत्सव अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो. माघ वद्य चतुर्दशीला साजरा होणारी महाशिवारात्री संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने साजरी केली जाते. भारतीय संस्कृतीत उत्सवांना विशेष महत्त्व आहे. यामध्ये काहीतरी शास्त्रीय, आध्यात्मिक आणि नैसर्गिक कारण दडलेले असते. 'शिव' म्हणजे कल्याणकारी आणि 'रात्री' म्हणजे विसावा किंवा अंधार दूर करणारी वेळ. वर्षातून १२ शिवरात्री येतात पण माघ महिन्यातील शिवरात्रीला 'महाशिवरात्री' म्हटले जाते. या रात्री पृथ्वीचा उत्तर गोलार्ध अशा स्थितीत असतो की मनुष्यातील ऊर्जा नैसर्गिकरित्या ऊर्ध्वगामी (वरच्या दिशेला) सरकते. म्हणूनच, या रात्री जागृत राहून पाठीचा कणा ताठ ठेवून बसण्याला विशेष महत्त्व आहे.

### पौराणिक कथा आणि संदर्भ

महाशिवरात्रीशी संबंधित अनेक कथा प्रचलित आहेत, ज्या या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करतात. या दिवशी भगवान शिव आणि माता पार्वती यांचा शुभ विवाह संपन्न झाल्याचे असे मानले जाते. हे मिलन म्हणजे 'पुरुष' आणि 'प्रकृती' यांचे एकत्रीकरण आहे. पौराणिक कथेनुसार, भगवान शिवाने या दिवशी सृष्टीचे चक्र सुरळीत ठेवण्यासाठी 'आनंद तांडव' केले होते. एकदा ब्रह्मा आणि विष्णू यांच्यात श्रेष्ठत्वावरून वाद झाला, तेव्हा त्यांच्यासमोर एक विशाल प्रकाशमान ज्योतिर्लिंग प्रकट झाले. ज्याचा अंत शोधणे कोणालाही जमले नाही. ते ज्योतिर्लिंग म्हणजे भगवान शिव होते. समुद्रमंथनातून निघालेले 'हलाहल' विष पिऊन शिवाने जगाला विनाशापासून वाचवले. हे विष कंठात साठवल्यामुळे त्यांना 'नीलकंठ' म्हटले जाते. त्या विषाचा दाह शांत करण्यासाठी देवांनी शिवाला रात्रभर जागृत ठेवले, तो दिवस म्हणजे महाशिवरात्री.



धर्म-संस्कृती
प्रमोद (श्याम) जोशी
मो.7447788349

### शिवपूजनाची पद्धत आणि शास्त्र

महाशिवरात्रीला शिवभक्त उपवास करतात आणि महादेवाची आराधना करतात. शिवाला अभिषेक अत्यंत प्रिय आहे. दूध, दही, मध, तूप आणि साखर या पंचामृताने तसेच शुद्ध जलाने महादेवाच्या पिंडीवर अभिषेक केला जातो. 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा जप करत केलेला अभिषेक मनाला शांती देतो. 'त्रिदलं त्रिगुणाकारं त्रिनेत्रं च त्रियायुधम्'असे बेलपत्राचे वर्णन केले जाते. तीन पानांचे एक बेलपत्र हे सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचे प्रतीक आहे. हे पान अर्पण करणे म्हणजे आपला अहंकार शिवाला अर्पण करणे होय. शिव हा वैराग्याचा देव आहे. अंगाला भस्म फासणे हे जीवनाच्या नश्वरतेचे प्रतीक आहे, तर रुद्राक्ष हे शिवाच्या अश्रूंपासून निर्माण झालेले मानले जातात, जे संरक्षणाचे प्रतीक आहेत.

### महाशिवरात्रीचे आध्यात्मिक पैलू

अध्यात्मिक दृष्टिकोनातून शिवरात्र म्हणजे स्वतःच्या आत डोकावण्याची वेळ. शिव म्हणजे शून्य आणि शिव म्हणजे अनंत. आपण जेव्हा ध्यानस्थ होतो, तेव्हा आपण आपल्यातील 'शिवतत्त्वा'शी जोडले जातो. ज्याला स्वतःच्या अस्तित्वाचा विसर पडतो आणि जो विश्वाशी एकरूप होतो, तोच खऱ्या अर्थाने शिव अनुभवतो. या रात्री निसर्गाची ऊर्जा आपल्याला साथ देत असते. मनातील नकारात्मक विचार, क्रोध, लोभ आणि मोह यांचा त्याग करून सात्विकतेकडे जाण्याचा हा मार्ग आहे.

### भारतातील प्रमुख शिवस्थाने आणि उत्सव

बारा ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी या दिवशी भक्तांचा महापूर ओसंडून वाहतो. काशी विश्वनाथ (वाराणसी) येथे गंगेच्या काठी भव्य सोहळा होतो. महाकालेश्वर (उज्जैन) येथील भस्म आरती जगप्रसिद्ध आहे. सोमनाथ (गुजरात) आणि त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे लाखो भाविक दर्शनासाठी येतात. महाराष्ट्रात घृष्णेश्वर, परळी वैजनाथ, औंढा नागनाथ आणि भीमाशंकर या ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणी मोठी यात्रा भरते.

### उपवासाचे महत्त्व आणि आहार

महाशिवरात्रीचा उपवास हा इंद्रियांवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न आहे. सात्त्विक आहार घेतल्यामुळे शरीर हलके राहते आणि ध्यानासाठी मन एकाग्र होते. महादेव हे 'योगेश्वर' आहेत. ते आपल्याला संयम, ध्यान आणि निसर्गाशी नाते जोडण्याची शिकवण देतात. पर्यावरणाचे रक्षण करणे, मनावर नियंत्रण मिळवणे आणि संकटाच्या वेळी शांत राहणे हे गुण आत्मसात करणे हीच खरी शिवपूजा आहे. महाशिवरात्री अंधाराकडून प्रकाशाकडे आणि अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्याचा उत्सव आहे. शिव हे केवळ एक नाव नसून ते एक चैतन्य आहे. जे आपल्या प्रत्येकात श्वासाच्या रूपाने वसलेले आहे. आपल्यातील वाईट प्रवृत्तींचा त्याग करून आपण एक उत्तम मनुष्य बनूया. सत्यं शिवं सुंदरम् - जे सत्य आहे, तेच शिव आहे आणि जे शिव आहे, तेच अत्यंत सुंदर आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या स्मरणार्थ विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास ॲम्बुलन्स भेट

**पंढरपूर, दि.११ फेब्रुवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष स्व. अजित पवार यांच्या स्मरणार्थ 'बारामती ॲग्रो कंपनी'च्या माध्यमातून येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास दोन ॲम्बुलन्स भेट स्वरुपात सुपुर्त करण्यात आल्या. मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांनी बारामती येथे जावून या भेट स्वरुपात दिलेल्या ॲम्बुलन्सचा स्विकार केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नुकतेच बारामती येथे विमान अपघातात निधन झाले. दरम्यान अजित पवारांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'बारामती ॲग्रो कंपनी'च्या माध्यमातून येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरासाठी सेवा म्हणून दोन ॲम्बुलन्स देण्यात आल्या. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते या ॲम्बुलन्स मंदिर समितीचे सदस्य हभप ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्याकडं सुपूर्द करण्यात आल्या. उपमुख्यमंत्री अजितदादांनी शेवटच्या श्वासापर्यंत सर्वसामान्य लोकांसाठीच काम केलं, दादांचं हेच कार्य आणि विचार यातून प्रेरणा घेऊन 'बारामती ॲग्रो कंपनी'च्या माध्यमातून या ॲम्बुलन्स मंदिर समितीला देण्यात आल्या. कार्यक्रमास आमदार रोहित पवार, राजेंद्र पवार, योगेश रणदिवे आदींसह बारामती ॲग्रो कंपनीचे अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.



### चाटे शिक्षण समूहामध्ये विद्यार्थ्यांना निरोप

**बार्शी, दि.११ फेब्रुवारी-**

चाटे शिक्षण समूह बार्शी येथे इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेचे संचालक पांडुरंग घाडगे उपस्थित होते. याप्रसंगी सोनाली घोरपडे, शुभम घोंगडे, शिवम घोंगडे, स्मिती निकम, सृष्टी पाटील व आदित्य मुळे या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून चाटे शिक्षण समूहाकडून मिळालेले ज्ञान व संस्काराची शिदोरी याबद्दल ऋण व्यक्त केले. संचालक पांडुरंग घाडगे म्हणाले, आपले आई-वडील व आपला क्लास हे म्हणजे आतापर्यंत सुरक्षा कवच होते. हे सुरक्षा कवच बाजूला करुन आपणाला उंच अशी भरारी घेऊन आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार करायचे आहे. हे स्वप्न साकार करीत असताना खूप मोठ्या अडी - अडचणी येतील. त्यांचा प्रतिकार करण्याची क्षमता आपल्यामध्ये असणे आवश्यक आहे. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकडून चाटे शिक्षण समूहाला एलईडीचे नाव भेट म्हणून देण्यात आले. यावेळी बालाजी माने, शैलजा लुंगारे, आरती जोशी, पूजा कोरफळकर, नंदा एखंडे, किरण अंधारे, स्वाती लोखंडे, कीर्ती देबडवार यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन यशराज घोगले, गुंड आर्या व सदाफुले समृद्धी यांनी केले. प्रास्ताविक श्रेया घोडके तर आभार साक्षी जमाले हिने मानले.

### क्रांती शेळके हिला 'स्काऊट-गाईड विद्यार्थी राज्य पुरस्कार'

**बार्शी, दि.११ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र विद्यालयातील इयत्ता ९ वी मध्ये शिक्षण घेत असलेली कु. क्रांती धिरज शेळके हिने राज्यस्तरीय स्काऊट-गाईड चाचणीत उल्लेखनीय यश संपादन करत 'स्काऊट-गाईड विद्यार्थी राज्य पुरस्कार' प्राप्त केला आहे. क्रांती शेळकेसह सर्व विद्यार्थ्यांचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून शिस्त, सेवा, नेतृत्व आणि सामाजिक जाणीव या स्काऊट-गाईड मूल्यांचा आदर्श घालून देणारे आहे. दि. २७ ते ३० जानेवारी व ३ ते ६ फेब्रुवारी या कालावधीत रामबाग, भोर (जि. पुणे) येथे राज्य पुरस्कार चाचणी व राज्यस्तरीय स्काऊट-गाईड विद्यार्थी परीक्षा पार पडली. या कठीण व सर्वांगीण क्षमतेची कसोटी पाहणाऱ्या परीक्षेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना 'स्काऊट-गाईड विद्यार्थी राज्य पुरस्कार' प्रदान करण्यात



आला. या राज्य पुरस्कारासाठी क्रांती शेळकेसह प्राची शिंदे, श्रुती दांगट, शरयू ठोंगे, श्रावणी हणमंते, प्रतीक्षा आवारी तसेच सुखदेव गव्हाणे, संस्कार उपळकर, श्रेयस पांगरे, स्वर्णीम मुठाळ, वेदांत गव्हाणे, अथर्व सातपुते, रणवीर गुंड या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना योगेश उपळकर, पी. डी. पाटील, श्रीमती चौधरी, लोमटे यांचे मार्गदर्शन लाभले.

### ब्रम्हपुरीच्या 'त्या' आजीचा मृतदेह ऊसाच्या फडात सापडला

**मंगळवेढा, दि.११ फेब्रुवारी-**

गेली महिनाभर बेपत्ता असलेल्या मोहनाबाई शिवाजी रणे (वय ७०) या वृध्द महिलेचा अखेर ऊसाच्या फडात मृतावस्थेत मृतदेह मिळून आला असून याची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे. यातील खबर देणारे भारत शिवाजी रणे (वय ६२) यांची आई तथा मयत मोहनाबाई रणे ही दि.१४ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता शेतातील राहते वस्तीवरुन अचानक बेपत्ता झाली होती. कुटूंबियांनी सर्वत्र परिसरात शोध घेतला मात्र ती मिळून न आल्याने मंगळवेढा पोलीसात मिसींग दाखल करण्यात आले होते. पोलीसांनी



सर्व पोलीस स्टेशनला याबाबत माहिती कळवून शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही. दि.९ फेबुवारी रोजी सकाळी ब्रम्हपुरी हद्दीतील गट नं.५४९/३/१ या गटातील ऊसाची तोडणी करण्याकरिता ऊसतोडणी कामगार आल्यावर ऊस तोडत असताना प्रथमता सदर वृध्देची साडी कामगारांना मिळून आली. त्या साडीवरुन पुढील बाजूस शोध घेतला असता त्या आजीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळून आला. या घटनेची माहिती खबर देणाऱ्यांनी पोलीसांना दिल्यानंतर पोलीसांनी जागेवर जावून त्या वृध्द आजीचा पोस्टमार्टम बॉडी डी कंपोज झाल्याने जागेवर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दरम्यान अज्ञात कारणावरुन हा मृतदेह मयत अवस्थेत मिळून आला असून पोलीसांनी सदर मृतदेहाचा व्हिसेरा राखून ठेवल्याचे सांगण्यात आले. याचा अधिक तपास बोराळे बीटचे पोलीस हवालदार मनोज खंडागळे हे करीत आहेत.

# विमलताईंना जि.प. अध्यक्ष करण्याचा निर्णय सर्वस्वी पक्षश्रेष्ठींचा : पालकमंत्री गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.११ फेब्रुवारी-**



मोहोळ तालुक्यात सर्वाधिक मतांनी विजयी झालेल्या विमलताई खताळ यांना जि प अध्यक्ष किंवा सभापतीचा बहुमान देण्याचा निर्णय भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतबैठक करून त्यांच्याशी विचार विनिमय करून ते सांगतील त्या पद्धतीनेच होईल, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार जयकुमार गोरे यांनी लांबोटी येथे केले.

लांबोटी येथील हॉटेल जयशंकर येथील नूतन जि प सदस्य श्रीमती विमल खताळ यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे अभिनंदन करण्यासाठी ते आले होते. यावेळी भाजपाच्या कामती जि प गटाच्या विजयी उमेदवार विमल खताळ, नरखेड जि. प चे विजयी उमेदवार लखन शिंदे या दोघांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी याप्रसगी अक्षय खताळ ,मोहोळचे स्वीकृत नगरसेवकसुशील क्षीरसागरआदींसह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी पत्रकारांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देताना त्यांनी हे विधान केले. भाजपाच्या नेतृत्वावर जनतेच विश्वास आहे खास करून ग्रामीण भागातली जनता भाजपाच्या पाठीशी आहे या निकालने दाखवून दिले आहे. त्यामुळे भाजपाच्या उमेदवाराला चांगल्या मतांनी निवडून दिले आहे असे सांगत विरोधकांनी केलेल्या टीकाटिपणीला जनतेने स्पष्टपणे नाकारल्याचे दिसून येत आहेअसे ते म्हणाले. यावेळी पत्रकारांनी यापूर्वी मोहोळ तालुक्याला जिल्हाध्यक्ष पदमिळाले नाही तीन वेळा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पद मिळाले परंतु जिल्हा परिषद अध्यक्ष पदावर मोहोळ तालुक्याची ५० वर्षांपासून वर्णी लागलेली नाही . विमलताई खताळ या सर्वाधिक मतांनी विजयी झाले आहेत त्यामुळे त्यांना जिल्हा अध्यक्ष पद मिळणार काय असे विचारले असता सध्याच्या परिस्थितीमध्ये जिल्ह्यातून ३८ सदस्य कमळ चिन्हावर निवडून आले आहेत. त्याचा आम्ही आनंद उत्सव करणार आहोत. मीटींगच्या माध्यमातून सगळ्यांचा सत्कार करणार आहोत . त्यानंतरच्या मीटिंगमध्ये कोण अध्यक्ष उपाध्यक्ष कोण विषय समिती सभापती याबाबतची चर्चा होईल.

## १७ ते २० फेब्रुवारी दरम्यान केम येथे कृषी प्रदर्शन



**श्री ऊत्तरेश्वर देवस्थान यात्रेनिमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.११ फेब्रुवारी-**

करमाळा तालुक्यातील केम येथे श्री ऊत्तरेश्वर देवस्थान यात्रेनिमित दि १७ ते २० फेब्रुवारी या कालावधीत श्री ऊत्तरेश्वर महाराज व छत्रपती शिवाजी महाराज कृषी प्रदर्शन २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे हे कृषी प्रदर्शन श्री ऊत्तरेश्वर देवस्थान मैदान येथे होणार आहे असी माहिती आयोजक नवनाथ खानट व गणेश आबा तळेकर यांनी दिली. या प्रदर्शनात कृषी क्षेत्रासी नवनवीन संशोधन व आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शैतकऱ्याना पोहचविण्यात यैणार आहे.

कृषी क्षेत्रासी निगडित १५० स्टाल हून अधिक कंपनीचे स्टाल सहभागी होणार आहेत या कृषी प्रदर्शनात शेती औजारे पशुसंवर्धन संगोपन शेतमाल प्रक्रिया उद्योग सेंद्रिय शेती ठिबक सिंचन हरित संकल्पना ड्रोन तंत्रज्ञान आधीची माहिती या कृषी प्रदर्शनात मिळणार आहे तरी या कृषी प्रदर्शनाचा शेतकरी बांधवांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन कृषी प्रदर्शन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## लोकविकास विद्यालयात बारावी परिक्षेस शांततेत सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

वेळापूर येथील लोकविकास विद्यालयावर बारावी बोर्ड केंद्रावर शांततेत सुरुवात झाली आहे. यावेळी विद्यालयाच्या वतीने बारावी परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. लोकविकास विद्यालय येथे १२ बोर्ड परिक्षेस २१५ विद्यार्थी बसले आहेत.

विद्यार्थ्यांना संस्थेचे सचिव चंद्रकांत नवले, इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक आर. बी. पवार, सुनिल पताळे, अजित बनकर, राहूल बनकर यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन परिक्षेस शुभेच्छा देण्यात आल्या. परिक्षा केंद्रावरती केंद्र संचालक म्हणून देवकर मारुती तर उपकेंद्र संचालक म्हणून पांढरे अमोल हे काम पाहणार आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी वेळापूर पोलीस स्टेशन च्या वतीने बंदोबस्त चोख ठेवला आहे.

## मंगळवेढ्यात आजपासून कृषी महोत्सवाचे आयोजन

**सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळातर्फे आयोजन**

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. ११ फेब्रवारी-**

येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाच्या वतीने सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दि. १२ व १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता शिवतीर्थ, शिवप्रेमी चौक, आठवडा बाजार, मंगळवेढा येथे हा दोन दिवसांचा कृषी महोत्सव आयोजिण्यात आला आहे.

डाळिंब, आंबा आणि ऊस या प्रमुख पिकांवरील आधुनिक लागवड तंत्र, पाणी व अन्नद्रव्यांचे संतुलित व्यवस्थापन, रोग-कीड नियंत्रण, जमिनीची सुपीकता वाढविण्याच्या उपाययोजना तसेच शाश्वत शेतीसाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर या विषयांवर तज्ज्ञांकडून सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दि. १२ फेब्रुवारी रोजी डाळिंब-आंबा महा चर्चासत्र होणार आहे. या चर्चासत्रात अखिल भारतीय डाळिंब संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ पोखरे, तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ, अजय आदाटे, डाळिंब मार्गदर्शक अक्षय सागर, प्रगतशील डाळिंब बागायतदार भाऊसाहेब जाधव तसेच आंबा बागायतदार सचिन कुलकर्णी हे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. दि. १३ फेब्रुवारी रोजी ऊस पीक महा चर्चासत्र व ऊस जाती प्रदर्शन होणार आहे. २०२५-२६ हंगामात उत्पादन वाढविण्यासाठी खोडवा व सुरु ऊस व्यवस्थापन, रोप लागवड पद्धती, अंतरखतपाणी, रोग व्यवस्थापन, जमिनीची सुपीकता टिकविणे तसेच नवीन एआय ऊस तंत्रज्ञानाचा वापर करून शाश्वत व दर्जेदार उत्पादन कसे घ्यावे, यावर सखोल चर्चा होणार आहे. याच दिवशी विविध ऊस जातींचे प्रत्यक्ष प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून, शेतकऱ्यांना योग्य जाती निवडीसाठी मार्गदर्शन मिळणार आहे.



या कृषी महोत्सवाचे उदघाटन विठ्ठल शुगरचे चेअरमन अभिजीत पाटील, व आवताडे शुगरचे चेअरमन संजय आवताडे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी सीताराम महाराज कारखान्याच्या चेअरमन राजलक्ष्मी गायकवाड-काळुंगे आहेत. यावेळी युटोपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक, दामाजी कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, भैरवनाथ उद्योग समूहाचे चेअरमन अनिल सावंत, तसेच जकाराया शुगरचे चेअरमन सचिन जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने केवळ उत्सव न साजरा करता शेतकऱ्यांच्या हितासाठी ज्ञानवाटपाचा उपक्रम राबविणे ही एक सामाजिक जबाबदारी असल्याचे आयोजकांनी सांगितले. या दोन दिवसांच्या कृषी महा चर्चासत्राचा लाभ परिसरातील जास्तीत जास्त डाळिंब, आंबा व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी, ९४०३४६०१९४, ९५५२२४३५९५, ८९२८९ २३४३४ यावर संपर्क करावा.



## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मोफत लेझीम प्रशिक्षणाचा अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त हिंदू रक्षक मित्र मंडळ, निराळे वस्ती, सोलापूर यांच्या वतीने यावर्षी एक अभिनव आणि सामाजिक जाणीव जपणारा उपक्रम राबविण्यात येत आहे.

डॉल्बी मुक्त शहर ही संकल्पना समोर आल्यानंतर पारंपरिक व सांस्कृतिक वारसा जपण्याच्या उद्देशाने मुली व मुलांना मोफत लेझीम प्रशिक्षण देण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. हा उपक्रम श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवाच्या निमित्ताने राबविला जात असून परिसरातून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या लेझीम प्रशिक्षणाची जबाबदारी अनुभवी प्रशिक्षक बळीराम जांभळे यांच्याकडे सोपविण्यात आली असून ते मुला-मुलींना शिस्तबद्ध, सुरक्षित व पारंपरिक पद्धतीने लेझीमचे धडे देत आहेत. शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना आणि सांस्कृतिक जाणीव वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे. हिंदू रक्षक मित्र मंडळाचे संस्थापक शेखर फंड यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविला जात आहे. उत्सव अध्यक्ष अक्षय जाधव यांच्यासह स्वप्निल चव्हाण, भैय्या वानखरे तसेच सर्व उत्सव पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली लेझीम संघाची घडण होत आहे.

दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या दिवशी निराळे वस्ती येथून अशा लेझीम ताफ्यासह मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत प्रशिक्षित लेझीम संघ पारंपरिक वेशभूषेत सहभागी होणार असून डॉल्बीमुक्त, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी असा हा सोहळा असणार आहे. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दीपक पेटकर, अमोल पवार, सोमनाथ वाघमोडे, भाऊ भागवत, प्रशांत साळुंखे, साईनाथ वानखरे आदी कार्यकर्ते विशेष परिश्रम घेत आहेत. समाजात सकारात्मक संदेश देणारा हा उपक्रम इतर मंडळांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.



### अज्ञात कारणावरुन तरुणाची आत्महत्या

**मंगळवेढा,दि.११ फेब्रुवारी-**

मंगळवेढा शहरातील १८ वर्षीय भाजी विक्रेत्याने अज्ञात कारणावरुन राहते घराच्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केल्याचा प्रकार घडला असून या घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे.

यातील मयत अरमान जमीर मुजावर (वय १८,रा. सराफ गल्ली) याने दि.१० फेबुवारी रोजी दुपारी ४ वाजता राहते घराच्या वरील बाजूस असलेल्या खोलीचे लोखंडी अँगलला अज्ञात कारणावरुन दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली असल्याची खबर जमीर तय्यब मुजावर यांनी पोलीसात दिली आहे. याचा तपास पोलीस करीत आहेत.

## मंगळवेढा शिवारात पावणे दोन लाखांचे पीकच नेले चोरुन

**मंगळवेढा, दि.११ फेब्रवारी-**

मंगळवेढा शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतातील १ लाख ७५ हजार रुपये किंमतीचे हरभरा पीक काढून ठेवलेले चोरट्याने चोरुन नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान सध्या सुगीचे दिवस असल्याने शिवारात शेतकऱ्यांनी विविध ठिकाणी हरभऱ्याची पिके काढून शेतात ढीग लावले असून या चोरीच्या घटनेमुळे शेतकरी वर्ग धास्तावून गेला आहे.



यातील फिर्यादी गणेश विष्णू कोंडूभैरी (रा.मंगळवेढा) यांची मंगळवेढा शिवारात बोराळे रोडवर जमीन गट नं. १८१२ मध्ये तीन एकर हरभरा पीक काढून ढिगारा लावला होता. दि.९ फेबुवारी रोजी सायंकाळी ७ ते सुर्योदया पूर्वी अज्ञात चोरट्याने तीन एकरातील ढिगारा लावलेले १ लाख ७५ हजार रुपये किंमतीचे हरभरा पीक मुद्दाम लबाडीने अज्ञात चोरट्याने चोरुन नेण्याचा प्रकार घडला आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार कांबळे हे करीत आहेत. दरम्यान सध्या सुगीचे दिवस असल्यामुळे काळ्या शिवारात जिकडे पहावे तिकडे हरभऱ्या सारखी पिके काढून शिवारात पडली आहेत. रात्रीच्या वेळी चोरटे या संधीचा गैरफायदा उठवत आहेत. चोरट्याने हरभरा पीक वाहनातून भरुन नेला असावा असा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. पोलीस या चोरीचा शोध लावणार का? याबाबत शेतकरी वर्गातून प्रश्न विचारला जात आहे. यापुर्वीही शेतकऱ्यांची अनेक ठिकाणी साठा करुन ठेवलेली मका चोरट्यांनी चोरुन नेल्याच्या तक्रारी दाखल असूनही पोलीसांना अद्याप त्या चोरट्यांचा शोध घेता आला नाही, त्यामुळे पोलीसांना हरभरा पिकाचा चोरटा तरी सापडणार का? असा सवाल सूज्ञ नागरिक व शेतकरी वर्गातून केला जात आहे.

# फिनिक्स पोदार लर्न स्कूल ठरली जिल्ह्यातील पहिली 'एआय सर्टिफाइड' शाळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्ह्याच्या शैक्षणिक इतिहासात नवा अध्याय लिहित फिनिक्स पोदार लर्न स्कूल (पी.पी.एल.एस.), बार्शीने सोलापूर जिल्ह्यातील पहिली एआय (rtificial Intelligence) सर्टिफाइड शाळा होण्याचा मान मिळवला आहे. विशेष म्हणजे, पी.पी.एल.एस. बार्शी ही महाराष्ट्रातील तिसरी तर संपूर्ण भारतातील बारावी एआय सर्टिफाइड शाळा ठरली असून, या उल्लेखनीय यशामुळे बार्शी व परिसराच्या शैक्षणिक नकाशावर मानाचा तुरा खोवला गेला आहे.



ही प्रतिष्ठित मान्यता रिलायन्स जिओच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली मिळाली आहे. भविष्यातील तंत्रज्ञानाशी विद्यार्थ्यांना आजच जोडण्याच्या उद्देशाने जिओ टीमच्यावतीने शाळेत सखोल व सर्वांगीण एआय प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणात इयत्ता ६ वी ते ९ वी मधील सर्व विद्यार्थी सहभागी झाले, तसेच संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही एआयचे अद्ययावत प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्गही बदलत्या डिजीटल युगाशी सुसंगत होण्यासाठी सज्ज झाला आहे.

या टीममध्ये एच.आर. निकम, नसीम काझी, वसीम खान (शाखा व्यवस्थापक), मिलिंद सौर आणि राहुल गव्हाणे यांचा सहभाग लाभला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे एआय संकल्पना विद्यार्थ्यांसाठी सोप्या, रोचक आणि उपयुक्त ठरल्या. पी.पी.एल.एस. बार्शी शाळा डीसीपी विजय कबाडे (अध्यक्ष), वैशाली विजय कबाडे आणि संदीप बरडे (सचिव) यांच्या सक्षम नेतृत्वाखाली सातत्याने शैक्षणिक प्रगती करत आहे. शाळेचे व्यवस्थापन आधुनिक शैक्षणिक गरजांचा विचार करुन नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी सदैव पुढाकार घेत असून शिक्षक व विद्यार्थ्यांना नव्या संधी उपलब्ध करुन देत आहे. प्राचार्य रविराज बेलुरे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पी.पी.एल.एस. बार्शी शिक्षणाची गुणवत्ता अधिकाधिक उंचावण्यासाठी कटिबद्ध आहे. केवळ पुस्तकी ज्ञानापुरते न थांबता, विद्यार्थ्यांना भविष्यातील कौशल्ये, तंत्रज्ञानातील प्रावीण्य आणि नवोन्मेषी विचारसरणी विकसित करण्यावर भर दिला जात आहे.

### राज्यस्तरीय भिम प्रतिष्ठान पुरस्कारसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. ११ फेब्रुवारी-**

भिम प्रतिष्ठानच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ज्या व्यक्तीनी शैक्षणिक सामाजिक, पत्रकारिता क्रिडा व कामगार क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केले आहे, अशा व्यक्तीसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

प्रस्ताव १४१, बुधवार पेठ, मिलिंद नगर या पत्त्यावर पाठवावा. प्रस्ताव स्वतःच्या नावाने व फोटोसह स्वाक्षरी असलेले प्रस्ताव पाठवावे. निनावी प्रस्ताव स्विकारले जाणार नाही, प्रस्ताव पाठविण्याचा दि. २० फेब्रुवारी पर्यंत पाठवावे, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष बाबा बाबरे (९८९०६२६६३६), अध्यक्ष विरेंद्र हिंगमिरे ९४२२०६७२६३ या नंबरवर संपर्क साधावा.




# आपला जिल्हा

गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६

# राम सातपुते हत्या कट प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करणार : पालकमंत्री गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ फेब्रुवारी-**

माजी आमदार राम सातपुते यांच्या हत्येचा कट रचल्याची धक्कादायक माहिती समोर आल्यानंतर जिल्ह्यात राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज जिल्हा नियोजन समिती (डी.पी.सी.) बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधत या प्रकरणाबाबत महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली.



पालकमंत्री गोरे म्हणाले की, माजी आमदार राम सातपुते यांच्या हत्येच्या कथित कटासंदर्भात पोलिसांनी सखोल चौकशी सुरू केली आहे. प्राथमिक माहितीच्या आधारे तपासाची दिशा निश्चित करण्यात आली असून, संपूर्ण प्रकरण गांभीर्याने हाताळले जात आहे. ''या प्रकरणात जो कोणी दोषी आढळेल, त्याच्यावर कायद्याप्रमाणे कठोर कारवाई केली जाईल. कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.''

काही लोकांमध्ये भीती किंवा संभ्रम निर्माण होण्याचे कारण नसल्याचेही त्यांनी नमूद केले. ''निष्पाप व्यक्तींनी घाबरण्याची गरज नाही. मात्र पोलिस तपासात दोष सिद्ध झाल्यास कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही,'' असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, या प्रकरणामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून विविध स्तरांतून प्रतिक्रिया उमटत आहेत. पोलिस प्रशासनानेही तपास वेगाने सुरू असल्याचे सांगितले आहे. संबंधितांकडून माहिती संकलित केली जात असून आवश्यक ते पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणातील सत्य लवकरच समोर येईल आणि दोषींना शिक्षा होईल, असा विश्वास व्यक्त करत पालकमंत्री गोरे यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे आवाहन नागरिकांना केले.

> माजी आमदार राम सातपुते यांच्या हत्येचा कट रचल्याची धक्कादायक माहिती समोर आल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज डी.पी.सी.ची बैठक संपन्न झाल्यानंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना पालकमंत्री म्हणाले की, माजी आमदार राम सातपुते यांच्या हत्येच्या कटा संबंधी पोलिस चौकशी सुरू झाली आहे. यामध्ये जो कोणी दोषी असेल, त्याच्यावर कारवाई करण्यात येईल. मात्र काही लोकांना यामध्ये अडचण येण्यासारखं काही नाही. परंतु पोलिस तपासणीत जो दोषी आढळून येतील. त्यावर तडजोड केली जाणार नाही असे देखील ना.जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले.

# मतदान केंद्रातील निष्काळजीपणा महागात; केंद्राध्यक्ष व पोलीस कर्मचारी निलंबित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ फेब्रुवारी-**

यशवंत नगर येथील मतदान केंद्रात लहान मुलाला घेऊन प्रवेश दिल्याप्रकरणी निवडणूक आयोगाने कठोर भूमिका घेत संबंधित दोघांना निलंबित करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या कारवाईमुळे निवडणूक प्रक्रियेत नियमांचे काटेकोर पालन करण्याबाबत प्रशासनाने स्पष्ट संदेश दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यशवंत नगर मतदान केंद्रावर मतदान सुरू असताना एका व्यक्तीने लहान मुलासह मतदान केंद्रात प्रवेश केल्याची घटना समोर आली. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार, मतदान केंद्रात केवळ मतदार आणि अधिकृत कर्मचारी यांनाच प्रवेश दिला जातो. विशेष परिस्थिती वगळता इतर कोणालाही, विशेषतः लहान मुलांना, मतदान कक्षात प्रवेशास परवानगी नसते. मात्र संबंधित केंद्रावर नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले.

या प्रकरणाची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचताच अहवाल मागविण्यात आला. प्राथमिक चौकशीत निष्काळजीपणा झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष अण्णा बुद्धे आणि तेथे नियुक्त पोलीस कर्मचारी गजानन राऊत यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात आली. त्यानुसार दोघांना तात्काळ निलंबित करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता आणि सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी आयोग अत्यंत दक्ष असून नियमभंग सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या घटनेनंतर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांना सूचनाही देण्यात आल्या असून नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, या कारवाईमुळे निवडणूक कर्मचाऱ्यांमध्ये खबरदारीचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी अधिक सतर्कता बाळगली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# जिल्ह्यात माळशिरसमध्येच वाजली 'तुतारी'

## एकेकाळी जिल्ह्यावर होते राज्य; तालुक्यापुरतेच उरले राजकारण

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.११ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत मोहिते-पाटील यांनी शिंदे गट व अजित पवार गटाबरोबर युती केली होती. यामध्ये तुतारी चिन्हावर फक्त पाचच जागा निवडुन आल्या. एकेकाळी संपुर्ण जिल्ह्यात राष्ट्रवादी शप गटाचे वर्चस्व होते. यंदा माळशिरस शिवाय इतरत्र कुठेच तुतारीचे आस्तित्व दिसून आले नाही. त्यामुळे तुतारी सोलापूर जिल्ह्यात फक्त माळशिरस तालुक्यापुरतीच मर्यादित राहिली आहे.

पंचायत समितीमध्ये बारा जागांपैकी आठ जागा ह्या राष्ट्रवादी काँग्रेस शप गटाने जिंकल्या. एकेकाळी संपुर्ण जिल्ह्यावर वर्चस्व गाजविणाऱ्या मोहीते-पाटलांची जिल्ह्यावरची पकड ढिली झाल्याचे दिसत आहे. मोहिते-पाटील घराण्याने लोकसभा निवडणुकीत भाजपापासून फारकत घेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला. यामध्ये धैर्यशील मोहिते-पाटील यांनी विजय संपादन करीत खासदारकी मिळविली पण देशात व राज्यात भाजप सरकार सत्तेत आल्यामुळे मोहिते-पाटील कुटुंबाची राजकारणात कोंडी झाली आहे. तर यामुळेच तालुक्यात भाजपने आपली पाळेमुळे घट्टच रोवली. यामध्ये तालुक्यातील अनेक दिग्गजांनी मोहीते-पाटील यांच्याशी फारकत घेत भाजपमध्ये प्रवेश केले आहेत. नुकत्याच झालेल्या अकलूज नगरपरिषद निवडणुकीतही मोहिते-पाटील यांना भाजपाविरुद्ध जिंकण्यासाठी संघर्ष करावा लागला. गुरसाळे पंचायत समिती गणातुन अर्जुनसिह मोहिते-पाटील यांना तसेच आमदार उत्तमराव जानकर यांचा मुलगा जीवन जानकर यांचाही दहीगाव जिल्हा परिषद गटात पराभव झाला. एकेकाळी सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणावर शरद पवार व मोहीते-पाटील यांची प्रचंड पकड होती पण सध्याचे चित्र बदलले आहे. भाजपने जिल्ह्यावर पकड निर्माण केली असुन ३९ जिल्हा परिषद सदस्य निवडून आले आहेत. एकेकाळी जिल्हा परिषदेचा संपुर्ण कारभार हा अकलूजमधुनच चालत होता. ती परंपरा खंडीत झाली आहे. मोहिते-पाटील हे ज्या शरदचंद्र पवार गटात आहेत त्या पक्षाचे माळशिरस तालुक्यात पाच जिल्हा परिषद सदस्य तुतारी चिन्हावर निवडून आले आहेत. त्यामुळे मोहिते-पाटील गटाला जिल्हा परिषदेत विरोधी बाकावर तर बसावे लागणार आहेच मात्र सध्या सोलापूर जिल्ह्यात तुतारी फक्त माळशिरस तालुक्यापुरतीच मर्यादित राहिली आहे. आता या निवडणुकीनंतर मोहिते-पाटील यांची भुमिका काय राहणार? याकडे संपुर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. जिल्ह्याच्या पुढील राजकारणातही त्यांची भूमिका महत्वाचीच ठरणार असून, त्यांचा नवीन निर्णय झाल्यास पुन्हा राजकीय समिकरणे बदलण्याची शक्यता आहे.

# विठ्ठल परिवारातील नेते एकत्र आल्याने यश

## पंढरपुरात मनसेचे दिलीप धोत्रे ठरले गेम चेंजर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ फेब्रुवारी -**

तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत विठ्ठल परिवाराचे नेते एकत्र आल्याने जिल्हा परिषदेसाठी पाच तर पंचायत समितीसाठी आठ सदस्य निवडून आल्याने पंढरपुरात विठ्ठल परिवाराची ताकद वाढली असून पांडुरंग परिवाराची ४० वर्षाची सत्ता खालसा करण्यात मनसे नेते दिलीप धोत्रे यांची भूमिका गेम चेंजर ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत अनेक घडामोडी पहावयास मिळाल्या. पंढरपूर नगरपरिषदेप्रमाणे विठ्ठल परिवाराला जिल्हा परिषद, पंचायत समितीमध्ये मोठे यश मिळेल अशी परिस्थिती असताना ऐनवेळी विठ्ठल परिवारातील कल्याणराव काळे, युवराज पाटील, गणेश पाटील यांनी भाजपा मध्ये प्रवेश केल्याने विठ्ठल परिवाराचे अस्तित्व धोक्यात आल्याची भावना परिवारातील कार्यकर्त्यांकडून व्यक्ती केली जात असताना पंढरपूर नगरपालिका निवडणुकीत विठ्ठल परिवाराचे संकट मोचक ठरलेले मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी आपल्या प्रदीर्घ राजकारणातील अनुभवाच्या जोरावर श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत पाटील, विठ्ठल परिवाराचे नेते,माजी चेअरमन भगीरथ भालके, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत, गटनेते नागेश भोसले यांना एकत्र केल्याने विठ्ठल परिवाराला पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या सात पैकी पाच जागा आणि पंचायत समितीच्या सोळा पैकी आठ जागा धोत्रे यांच्या शिष्टाईमुळे निवडून आणण्यात यश आल्याने पंढरपुरात विठ्ठल परिवाराची ताकद वाढली असून पुन्हा एकदा मनसे नेते दिलीप धोत्रे यांची भूमिका गेम चेंजर ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.



> **जनतेने दाखवलेल्या विश्वासास विठ्ठल परिवार पात्र ठरेल : दिलीप धोत्रे**
>
> चाळीस वर्षाची सत्ता परिवर्तन होऊन नगरपालिकेप्रमाणे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत विठ्ठल परिवार एकत्र आल्याने यश मिळवता आले. परिवारातील नेते बाजूला गेल्याने त्यांना अपयश आले. त्यांनी चूक सुधारून परत परिवारात सामील होऊन जनतेची सेवा करावी. पालकमंत्र्यांनी दुजाभाव न करता मदत करावी. नागरिकांना हेलपाटे लावणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घातले जाणार नाही. जनतेने दाखवलेल्या विश्वासास पात्र ठरू असा विश्वास दिलीप धोत्रे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून नागरिकांना दिला.

# चिणके येथे नूतन सदस्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.११ फेब्रुवारी -**

महायुतीच्या कडलास जि.प गटाच्या शोभाताई खटकाळे व कडलास पं.स गणाच्या राणीताई पाटील या विजयी सदस्यांचा चिणके (ता.सांगोला) येथील महिला व ग्रामस्थ यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी उज्वला मिसाळ, स्वाती मिसाळ, सुनंदा मिसाळ, ग्रा.पं.सदस्य संगीता शितोळे, रेश्मा जाधव, अनिता मिसाळ, शोभा शिंदे, तसेच माजी ग्रा.पं.सदस्य डॉ.नवनाथ मिसाळ, कृष्णदेव मिसाळ, संजय मिसाळ उपस्थित होते.

# विकासकामांचे विषय सूचवा : नगराध्यक्षा आवताडे

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ११ फेब्रुवारी-**

मंगळवेढा शहरातील प्रभागाच्या विकास कामांना मंजुरी देण्यासाठी विषय सुचवा असे आवाहन नगराध्यक्षा सुनंदा आवताडे यांनी सर्व नगरसेवक व प्रतिष्ठित नागरिकांना केले आहे.

मंगळवेढा नगरपरिषदेची नियोजित सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभेचा अजेंडा काढण्यासाठी नगराध्यक्षा आवताडे यांनी आपल्या प्रभागातील विकास कामे सुचविणे बाबत सर्व नगरसेवकांना लेखी पत्र दिले आहे. शहरातील प्रतिष्ठित नागरिकांनाही धोरणात्मक विकास कामांना न्याय मिळवून देण्यासाठी विषय देणेबाबत जाहीर आवाहन केले आहे. नगराध्यक्षा आवताडे यांच्या या लोकाभिमुख निर्णयामुळे मंगळवेढा नगरपरिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वच राजकीय पक्षाच्या नगरसेवकांना व प्रतिष्ठित नागरिकांना विकास कामाबाबत लोकाभिमुख कामकाजाची सुरूवात झाली आहे.



नगराध्यक्षांनी निवडणूकीतील विरोध किंवा राजकीय गटा तटाच्या राजकारणला महत्व न देता शहराच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. नगराध्यक्षा आवताडे यांनी आवाहन केलेल्या पत्रात मंगळवेढा शहरातील नागरिकांच्या मुलभूत तथा पायाभूत सुविधा व मंगळवेढा शहराच्या धोरणात्मक विकास कामांसाठी मंगळवेढा नगरपरिषदेमध्ये जनतेने आपणास आपल्या प्रभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सन्मानाने पाठविले आहे. त्या लोकसन्मानाचा आदर करणे व आपल्या प्रश्नांची विचारपूस करून त्या समस्या सोडविणे ही थेट जनतेतून निवडून आलेल्या लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून माझे कर्तव्य आहे. प्रभागातील किंवा शहरातील सार्वजनिक विकास कामांना समाविष्ट करण्यासाठी लेखी स्वरूपात विकासकामांचे विषय तत्काळ देऊन लोकसन्मानाचा आदर करावा. जेणेकरून सभेमध्ये सदर विषय मंजूर करून लोकाभिमुख विकास कामांना मंजुरी देता येईल. चला एकत्र येऊ या ! स्वच्छ, सुंदर व विकासाभिमुख मंगळवेढा शहराची निर्मिती करूयात! असे विकासाभिमुख आवाहन त्यांनी केले आहे.

# मतदारांची 'रणजित' पर्वास साथ; बबनदादांच्या गैरहजेरीत यश

## साडेतीन हजाराचा ऊस दर ठरला कळीचा मुद्दा

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.११ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक निकालात येथील स्वाभिमानी मतदारांनी भाजपाच्या पदरात जि.प.च्या पाच पैकी चार तर पं.स.च्या सात जागा निवडून देत घवघवित यश मिळवून देत 'रणजित पर्व' ला साथ दिली आहे. जिल्हा दुध संघाचे चेअरमन भाजप नेते रणजितसिंह शिंदे यांचे नेतृत्व यानिमीत्ताने सिध्द झाले आहे. विशेष म्हणजे हे यश माजी आ. बबनराव शिंदे यांच्या अनुपस्थितीत मिळाल्याने रणजितसिंह शिंदे वन मॅन आर्मी ठरले आहेत.

माढा विधानसभा मतदारसंघामध्ये मूळ तालुक्यातील पाच जि.प. गट व आठ पं.स.गण येतात. भाजपने जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्या नेतृत्वात निवडणूका लढवल्या. भाजप विरोधात खा.धैर्यशिल मोहीते-पाटील, आ.अभिजीत पाटील यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, दोन्ही शिवसेना अशी आघाडी करून आव्हान दिले होते.





तालुक्यातील बहुतांशी ग्रामपंचायत, जिल्हा बँक, दुध संघ, सोसायटी या शिंदे यांच्या ताब्यात असून विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याच्या माध्यमातून येथील शेतकरी, कामगार वर्ग शिंदे यांच्याबरोबर जोडला गेला आहे. तालुक्यातील मानेगाव, उपळाई, टेंभूर्णी, मोडनिंब या चार गटातील जि.प.सदस्य हे भाजपाचे तर बेंबळे गटात शिवसेना शिंदे गटाचे संजय कोकाटे निवडून आले आहेत. मुख्य मुद्दा आमदार पाटील यांच्याकडून विधानसभा निवडणूकीपुर्वी अगर मागील दीड वर्षात वेळोवेळी जे खोटी आश्वासने, विकासाच्या गप्पा मारण्यात आल्या त्या सर्व साफ खोट्या निघाल्याने तालुक्यातील शेतकरीवर्गात त्यांच्याविरोधात संतापाची लाट होती. विधानसभा निवडणूकीपुर्वी ऊसाला साडेतीन हजार देतो म्हणून थापा मारून निवडून आल्यानंतर दुसरा गळीत हंगाम संपत आला तरी अद्याप दर देवू न शकलेले आ. पाटील यांची पोलखोल करण्यात पालकमंत्री जयकुमार गोरे, रणजितसिंह शिंदे यशस्वी झाले. विठ्ठल कारखान्याच्या शेतक-यांना, कामगारांना पगारापोटी देण्यात येणारे रक्कम शासनाचे ३५० कोटी रूपयाचे भर सभेतुन आमदारांनी कसे नियमबाह्य खर्ची टाकले ते मतदारांना पटवून देण्यात श्री. शिंदे यशस्वी झाले. रणजितसिंह शिंदे यांनी दुध संघात भ्रष्टाचार केल्याचा भर प्रचारसभेत आमदारांनीही आरोप केला मात्र रणजितसिंहांनीही या आरोपाला उत्तर देत मी संघाचा राजीनामा देतो शासनाने पूर्ण चौकशी करावी दोषी आढल्यास कोणतीही शिक्षा भोगण्यास तयार असल्याचे सांगितले. पण कारखान्याच्या ३५० कोटीचीही चौकशी करण्याची मी मागणी करणार असल्याचे बोलून आमदारांना कोंडीत पकडले. आमदारांच्या आणी खासदारांच्या प्रत्येक आरोपाला शिंदे यांनी जे उत्तर दिले ते लोकांना पटल्यानेच हे यश शिंदेंच्या पदरी पडल्याचे दिसते. याबरोबरच एआय च्या माध्यमातून आ.पाटील यांनी शिंदे यांची प्रचारादरम्यान केलेली कार्टून्स माढ्यातील स्वाभिमानी मतदारांना पटलेली दिसत नाही.

आमदार पाटील यांनी माढ्याचे जवळपास २०० प्रश्न विधानसभेत उपस्थीत केले मात्र आमदार फंड वगळता तालुक्यासाठी २ कोटी सुध्दा आणू शकले नाहीत. हा प्रमुख मुद्दा शिंदे यांनी मतदारांना पटवून दिला. त्यामुळे मतदारांनी यावेळेस विकासाला प्राधान्य देत शिंदे यांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहुन भाजपाला साथ दिली. शेवटी रणजितसिंह शिंदे यांच्या विधानसभा निवडणूकीतील पराभवानंतर स्वतः मध्ये बदल केल्याचे मतदारांना जाणवले. मतदारांच्या मते त्यांच्यात ७० टक्के चांगला बदल झाला असून अजून ३० टक्के बदल झाल्यास चित्र १०० टक्के यशाकडे गेले असते. मोडनिंब व बेंबळे पं.स.गणात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसला अनुक्रमे एक एक जागा जिंकता आली. तर उपळाई गणात अपक्ष एक निवडून आला आहे. ३० वर्षात माजी आ.बबनराव शिंदे यांनी केलेली विकास कामे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची मिळालेली खंबीर साथ रणजितसिंह शिंदे यांचे अचूक नियोजन आणी आमदार खासदारांची केलेली आभ्यासपूर्ण पोलखोल यामुळेच भाजपाला यश मिळाल्याचे दिसून आले.

> **हमे तो अपनो ने लुटा, गैरो में कहा दम था ...!**
>
> आ.अभिजीत पाटील व खा.धैर्यशिल मोहीते पाटील यांच्या आघाडीतील एकमेव जि.प. स.म्हणून शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाचे संजय कोकाटे निवडून आले. विशेष बाब म्हणजे या गटातील बहुतांशी गावामध्ये माजी आ.बबनराव शिंदे यांची निर्विवाद सत्ता आहे.मात्र तरीही या गटात कोकाटे यांना जवळपास अकरा गावात आघाडी भेटली. खरेदी विक्री संघाचे चेअरमन माजी उपसभापती तुकाराम ढवळे यांच्या पत्नी रोहीणी ढवळे यांचा पराभव झाला. निमगावकरांच्या नाकाजवळच्या पिंपळणेर गावातून कोकाटे यांना आघाडी भेटल्याने ढवळे यांचा परभव झाला. जवळपास सर्वच गावातून तुकाराम ढवळे यांच्यावरील नाराजी व भावकीची भांडणे यातुनच पराभव झाला. यामुळे सर्व सत्तास्थाने शिंदे यांच्या ताब्यात असूनही ढवळे यांचा पराभव म्हणजे हमे तो अपनो नें लुटा गैरो में कहा दम था मेरी कीस्ती ही डुबी थी वहा जहा पाणी कम था! हा दिलवाले चित्रपटातील डायलॉंग कदाचीत तुकाराम ढवळे यांना आठवला असेल.